Jagdamba Education Society's
SND POLYTECHNIC
KNOWLEDGE PERSPECTIVE UNDERSTNING

**Jagdamba Education Society's**

# Santosh N. Darade Polytechnic

**At.Babhulgaon, Tal.Yeola, Dist.Nashik- 423 401**

## * Central Library *

Accredited by
NBA
NATIONAL BOARD OF ACCREDITATION

Please Consider the Environment Before Printing…

**Date: 03/06/2025**

## Activity Name: Day Special

## दिन विशेष

**News Paper Name: आपलं महानगर**

**Page No. 04**

# दिनविशेष

## लेखिका, बालसाहित्यिक आनंदीबाई शिर्के



आनंदीबाई शिवराम शिर्के या कथाकार आणि बालसाहित्यकार म्हणून ओळखल्या जातात. त्यांचा जन्म ३ जून १८९२ रोजी मुंबईतील चिंचपोकळी येथे झाला. पूर्वाश्रमीच्या अनसूया गोविंदराव शिंदे यांचे मूळ गाव पुणे जिल्ह्यातील मंचर तालुक्यातील रांजणी होते. आनंदीबाईंचे वडील बडोद्याला गायकवाड सरकारच्या सेवेत नोकरी करीत असल्यामुळे आनंदीबाईंचे बालपण गुजरातमध्ये गेले. परंतु, कौटुंबिक अडचणींमुळे शिक्षणात खंड पडला. त्यांनी नर्सिंगचे शिक्षण घेतले; पण त्यालाही घरातून विरोध होता. वयाच्या अठराव्या वर्षापासून त्या लेखन करू लागल्या होत्या. 'कुमारी आनंदी' या नावाने कथालेखन सुरू केले. १९१० मध्ये त्यांची पहिली कथा 'शारदाबाईंचे संसारशिल्प', 'मासिक मनोरंजन'मध्ये प्रसिद्ध झाली. त्याच वर्षी 'मासिक मनोरंजन'मध्येच त्यांचा 'स्वच्छता' हा निबंध प्रसिद्ध झाला. विवाहानंतर पती शिवरामपंत शिर्के यांच्या साहित्यक्षेत्रातील वावरामुळे आनंदीबाईंचा अनेक नामवंत साहित्यिकांशी परिचय होऊन मैत्री झाली. श्रीपाद कृष्ण कोल्हटकर त्यांना आपली मुलगीच मानत असत.

निबंध, कथा, बाल-साहित्य, स्त्री-साहित्य, अनुवादित साहित्य, आत्मवृत्त अशी बहुविध साहित्यनिर्मिती आनंदीबाईंनी केली. त्यांचं 'सांजवात' हे आत्मचरित्र प्रसिद्ध आहे. कथाकुंज, कुंजविकास, जुईच्या कळ्या, भावनांचे खेळ व इतर गोष्टी, तृणपुष्पे, गुलाब जांब, माझ्या आवडत्या गोष्टी, वाघाची मावशी व इतर गोष्टी, कुरूप राजकन्या व तेरावी कळ आणि इतर गोष्टी, आपली थोर माणसे, अशी त्यांची पुस्तकं प्रसिद्ध आहेत. १९३८ सालच्या अखिल भारतीय मराठी महिला परिषदेच्या त्या अध्यक्षा होत्या. त्यांच्या स्मरणार्थ मराठी साहित्य परिषदेच्या वर्धापन दिनानिमित्त दरवर्षी उत्तम कथासंग्रहासाठी 'आनंदीबाई शिर्के' पारितोषिक दिले जाते. आनंदीबाई शिर्के यांचे ३१ ऑक्टोबर १९८६ रोजी निधन झाले.

Nashik Edition

Jun 03, 2025 Page No. 4

Powered by: erelego.com

S.N.D. POLYTECHNIC, BABHULGAON
CENTRAL LIBRARY
YEOLA DIST. NASHIK

Jagdamba Education Society's
SND POLYTECHNIC
KNOWLEDGE PERSPECTIVE UNDERSTNING

LIBRARIAN
MR.U.D. MULANI
SND POLYTECHNIC
YEOLA-423401

PRINCIPAL
PROF.U.B JADHAV
SND POLYTECHNIC
YEOLA-423401